**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Kailas Jaywant kodag(I (Inspector)) / PNMAH52874 **or**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे **Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): Kailas Jaywant kodag
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PNMAH52874

मा. विशेष न्यायालय सो, सांगली.



# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सांगली  **P.S.(ठाणे):** भिलवंडी पोलीस स्टेशन  **Year (वर्ष):** 2020

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0117  **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 11/09/2020 23:16 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): शुक्रवार  **Date From** (दिनांक पासून): 11/09/2020

**Time Period** (कालावधी): पहर 5  **Date To** ( दिनांक पर्यंत): 11/09/2020

**Time From** (वेळेपासून): 14:53 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 14:53 बजे

**(b) Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 11/09/2020  **Time** (वेळ): 22:30 बजे

**(c) General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद 028  **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 11/09/2020 22:56 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्तळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): दक्षिण, .50 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): भिलवडी,पलूस

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नांव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अवधुत श्रीकांत निकम

(b) **Father's Name** (वडील का नाव) : श्रीकांत

(c) **Date/Year of Birth** (जन्म 1995  (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):  **Date of Issue** (अदा केल्याची तारीख):

**Place of Issue** (अदा केल्याची ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पाटील गल्ली,भिलवडी ,पलूस,भिलवंडी पोलीस स्टेशन,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पाटील गल्ली,भिलवडी ,पलूस,भिलवंडी पोलीस स्टेशन,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.): 91-8482917171

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राजेंद्र दिनकर पाटील | | | 1. गणपती मंदीरा जवळ, ,कापूसखेड , वाळवा ,इस्लामपूर,सांगली,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2000 रू दराच्या 6 नोटा | 12,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 12,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम सूचना तथ्य ):

वर्दी जबाब ता.11.09.2020मी अवधूत श्रीकांत निकम वय 25 वर्ष व्यवसाय:- बिल्डींग मटेरिअल विक्री दुकान (निकम ट्रेडर्स, भिलवडी) रा. भिलवडी ता. पलूस जि. सांगली मो.नं. 8482917171.मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासहीत राहतो. माझे भिलवडी येथे निकम ट्रेडर्स नावाचे बिल्डींग मटेरिअल विक्रिचे दुकान आहे.मी मागील वर्षी मे-जुन 2019 मध्ये जिल्हा परिषद सांगली कार्यालयामध्ये भिलवडी येथील मुस्लीम दफनभूमीमधील शेडच्या बांधकामाचे टेंडर भरले होते. त्याप्रमाणे मला सदरचे टेंडर मंजूर झाले होते. मी सदर टेंडर मधील मुस्लीम दफनभूमीमधील शेडच्या बांधकामाचे काम डिसेंबर 2019 मध्ये पुर्ण केले आहे. परंतू सदर कामाचे 4,00,000/- रूपयाचे बिल अद्याप मला मिळालेले नाही. सदर कामाच्या बिलाच्या चेकवर ग्रामविकास अधीकारी व सरपंच यांच्या सहीने ग्रामविकास अधीकारी यांचेकडून सदरचा चेक मिळत असल्याने मी ग्रामपंचायत कार्यालय भिलवडी येथे जावून तेथील ग्रामविकास अधीकारी श्री. पाटील यांचेकडे वारंवार चौकशी केली होती. परंतू मला त्यांचेकडून माझ्या कामाचा 4,00,000/- रूपयाचा चेक मिळाला नाही.माझ्या वरील प्रमाणे कामाच्या चेकचे काम अद्याप पर्यंत प्रलंबीत असल्याने दि.08.09.2020 रोजी मी ग्रामपंचायत कार्यालय भिलवडी येथे जावून ग्रामविकास अधीकारी श्री. पाटील यांची भेट घेवून माझ्या कामाचा चेक देण्याबाबत विनंती केली असता. श्री. पाटील, ग्रामविकास अधीकारी यांनी मला तुम्हाला तुमच्या कामाचा चेक देतो परंतू तुम्हाला सदर 4,00,000/- रूपये चेकच्या 3 टक्के रक्कम मला द्यावी लागेल. असे म्हणाले. त्यावर मी त्यांना 3 टक्के कशाचे असे विचारले असता श्री. पाटील यांनी मला तुम्ही 3 टक्के प्रमाणे 12000/- रूपये दिलेत तर तुमच्या बिलाचा चेक तुम्हाला लगेच मिळेल नाहीतर तुमच्या कामामध्ये त्रुटी निघतील असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना ठिक आहे असे म्हणून निघून आलो. मला श्री पाटील यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी काल दि.10.09.2020 रोजी घाटगे साहेब पोलीस उप अधीक्षक अन्टी करप्शन ब्युरो सांगली यांचेशी संपर्क साधुन श्री पाटील यांनी भिलवडी मुस्लीम दफनभुमी येथे केलेल्या शेडच्या बांधकामाचे 400000/- रुपयांचे बिलाचा चेक काढणे करीता 400000/- रुपयाच्या तीन टक्के प्रमाणे 12000/- रुपये लाच मागीतले बाबत त्यांना सांगीतले त्याप्रमाणे त्यांनी आम्ही दुपारी 1 वाजणेचे सुमारास भिलवडी येथे येत असले बाबत सांगीतले. त्याप्रमाणे काल दि.10.09.2020 रोजी मी निकम ट्रेडर्स या माझ्या दुकानात हजर असताना घाटगे साहेब व त्यांचा स्टाफ असे शासकीय टाटा सुमोने माझे दुकानात आले व त्यांनी मला पोलीस निरीक्षक श्री चौगुले साहेब व सापळा पथक यांची ओळख करुन दिली. त्यानंतर चौगुले साहेब यांना मी माझी ग्रामविकास अधीकारी पाटील यांचे विरुध्द लाचमागणीची तक्रार असले बाबत सांगीतले. चौगुले साहेब यांनी मला लाच मागणीच्या तक्रारीचा अर्ज देणे बाबत सुचना दिल्या, त्याप्रमाणे मी त्यांना माझा लाचमागणीचा तक्रारी अर्ज दिला. त्यानंतर चौगुले साहेब यांनी सापळा पथका व्यतीरिक्त दोन हजर असले अनोळखी व्यक्तीची पंच साक्षीदार म्हणून ओळख करुन दिली. त्यानंतर चौगुले

साहेबांनी सदर कारवाईसाठी श्री.प्रदिप शंकर चव्हाण यांनी पंच नं. 1 म्हणुन व श्री. अनिल आनंदा जाधव यांनी पंच नं. 2 म्हणुन काम करण्याचे ठरवले.त्यानंतर चौगुले साहेबांनी मला दिले सुचनेप्रमाणे मी माझी लाच मागणीची तक्रार थोडक्यात कथन केली. त्यानंतर चौगुले साहेबांनी माझा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला. दोन्ही पंचानी तक्रारी अर्ज वाचून मी, तोंडी सांगीतलेली तक्रार व तक्रारी अर्जामधील मजकूर एकच असल्याचे सांगीतले. त्यानंतर सदर तक्रारी अर्ज वाचलेबाबत तक्रारी अर्जावर दोन्ही पंचांनी सह्या केल्या. त्यानंतर चौगुले साहेब यांनी मला दोन्ही पंचाना व्हाईस रेकर्डर व नवीन मेमरी कार्ड बाबत माहिती देवून पडताळणी कामी मला व पंच श्री चव्हाण यांना आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर चौगुले साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकर्डर सुरु करुन माझेकडे दिला. मी तो माझे अंगावरील पन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशामध्ये ठेवला. त्यानंतर चौगुले साहेब यांनी मला व पंच चव्हाण यांना ग्रामपंचायत कार्यालय येथे लोकसेवक श्री पाटील ग्रामविकास अधीकारी यांची त्यांचे कार्यालयात जावून भेट घेण्यास जाणेकरीता रवाना होणे बाबत इशारा केला. त्याप्रमाणे मी व पंच श्री. चव्हाण असे माझ्याकडील सीबी युनिकर्न मोटर सायकल क्र एम.एच.10. बी.वाय 9440 ने रवाना होवून ग्रामपंचायत कार्यालय भिलवडी येथे दाखल झालो. पंच श्री चव्हाण असे मोटर सायकल वरुन खाली उतरले नंतर मी रोड कडेला मोटर सायकल पार्क केली. मी व पंच चव्हाण असे पायी चालत ग्रामपंचायत कार्यालयात श्री पाटील बसतात त्याठिकाणी जावुन त्यांना नमस्कार केला. लोकसेवक पाटील हे काही लोकांसोबत चर्चा करीत होते. काही वेळातच लोकसेवक पाटील यांनी मला बाहेर येण्याबाबत हाताने इशारा केला. त्याप्रमाणे मी व पंच चव्हाण असे पाटील यांच्या सोबत ग्रामपंचायत कार्यालयाच्या बाहेर आलो. त्या ठिकाणी श्री पाटील मला म्हणाले अत्ता तुझाच विषय चालला होता. त्यावर मी त्यांना आपला विषय असे म्हणालो. त्यावर श्री. पाटील यांनी चार लाखाचे तीन टक्यांनी बारा हजार असे म्हणुन बारा हजार रुपयांची लाच मागणी केली. त्यानंतर मी श्री. पाटील यांना थोड कमी करा असे म्हणून लाच रक्कम कमी करण्याबाबत विनंती केली. त्यावर ते सगळं चेक फायनल करून देणार, मी ठेवत नाही असे म्हणाले. त्यावर मी श्री. पाटील यांना चेक बाबत विचारले असता त्यांनी तुम्ही मला पावती आनुन द्या सोमवारी, काय अडचन नाही सोमवारच्या आत जरी अण्णा आलं तरी सह्या घेवून ठेवतो असे म्हणाले. त्यावर मी श्री. पाटील यांना बारा हजार असे म्हणून चेक मिळणार, किती दिवस लागतील असे विचारले असता ते आण्णा उद्या जर आले तर मी सह्या घेणार आणि डायरेक्ट तुमच्या खात्यावर चेक काढून देणार असे मला म्हणाले. त्यानंतर माझेत व श्री पाटील यांच्यात कामाबाबत चर्चा झाल्यानंतर मी बारामध्ये काही कमी होनार नाही का असे श्री पाटील यांना विचारले असता. उद्या आण्णा आले की मी सह्या करून घेणार, अण्णा नाहीत म्हणून थांबलोय असे मला म्हणाले. त्यावर मी श्री. पाटील यांना तुमचीच सही करायची ना असे विचारले असता ते दोघांची सही लागते असे मला सांगून श्री. पाटील यांनी डीडी काढाय लागतो असे सांगून एचडीएफसी मधून डीडी काढण्यास सांगीतला. त्यावर मी लोकसेवक श्री. पाटील यांना डीडी काढत असल्याबाबत सांगून कधी येवू असे विचारले. त्यावर लोकसेवक श्री. पाटील यांनी मला उद्या फोन करतो असे सांगून माझा मोबाईल नंबर विचारुन घेवुन उद्या किशोरला सोबत घेवुन जावा व तुम्ही मला फोन करून या असे सांगीतले. त्यानंतर मी व पंच चव्हाण असे ग्रामपंचायत परिसरातून रोडवर मोटर सायकल पार्क केले ठिकाण येवून मी व पंच चव्हाण असे माझे मोटरसायकलीवरुन ग्रामपंचायत भिलवडी येथून रवाना होवून सापळा पथक थांबले ठिकाणी आलो.त्यावेळी चौगुले साहेब यांनी माझेकडील व्हाईस रेकर्डर घेवून तो बंद करुन त्यांचे ताबेत घेतला. चौगुले साहेब यांनी पंच चव्हाण यांना घडलेली हकीकत विचारली असता पंच चव्हाण यांनी घडलेली हकीकत सांगीतली. त्यानंतर चौगुले साहेब यांनी मला हकीकत विचारली असता मी ही त्यांना घडलेली हकीकत सांगीतली. त्यानंतर चौगुले साहेब यांनी व्हाईस रेकर्डर चालू करुन पडताळणी कारवाई दरम्यान झालेले संभाषण ऐकले. ग्रामविकास अधीकारी श्री पाटील यांनी माझ्या कामाच्या बिलाचा 4,00,000/- रुपयाचा चेक देणे करीता, चार लाख रुपयाच्या तीन टक्के 12,000/- रुपये लाच रक्कम मागणी करुन दि.11.09.2020 रोजी घेवुन येण्यास सांगितल्याने दि.11.09.2020 रोजी 12,000/- रुपये लाच रक्कम तयार ठेवण्यास सांगीतली. चौगुले साहेब यांनी मला आवश्यक त्या सुचना देवुन ते सापळा पथकासह अन्टी करप्शन कार्यालय सांगली येथे निघुन गेले. त्याप्रमाणे आज दुपारी 12.30 वाजणेचे सुमारास घाटगे साहेब, चौगुले साहेब, सापळा पथक व पंच श्री चव्हाण व श्री जाधव असे माझे दुकानाचे सुमोर शासकीय टाटा सुमोने येवुन थांबले मी दुकानातच होतो. चौगुले साहेब यांनी मला टाटा सुमोमध्ये येवून बसणे बाबत सांगीतले त्याप्रमाणे मी टाटा सुमोमध्ये बसलो. चौगुले साहेब यांनी मला लाच रक्कम 12,000/- रुपये हजर करणे बाबत सुचना दिल्या त्याप्रमाणे दुकान व्यवसायातील शिल्लक रक्कम 12,000/- रुपये हजर केली. त्यामध्ये 2000/- रुपये दराच्या सहा नोटा होत्या. त्यानंतर चौगुले साहेबांच्या सुचनेवरून दोन्ही पंचांनी माझी अंगझडती घेतली. त्यानंतर चौगुले साहेब यांनी अथ्रासिन पावडरचे उपयोग व गुणधर्म सांगीतले. त्यानंतर पोना मकानदार यांनी 12,000/-रुपये रकमेच्या नोटांना अथ्रासिन पावडर लावून ती लाच रक्कम लोकसेवक श्री पाटील, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत भिलवडी यांना देणेसाठी माझे पन्टचे पाठीमागील उजवे बाजूच्या खिशात ठेवली. त्यानंतर चौगुले साहेबांनी मला दोन्ही पंच व सापळा पथकाला आवश्यक त्या सुचना दिल्या. पोना मकानदार यांना जागीच थांबण्याबाबत सुचना दिल्या.त्यानंतर चौगुले साहेबांनी व्हाईस रेकर्डर मध्ये नवीन मेमरीकार्ड टाकून तो व्हाईस रेकर्डर सुरु करुन माझेकडे दिला, तो मी माझे पन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये ठेवला. मला व पंच चव्हाण यांना रवाना होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे आम्ही माझेकडील सीबी युनिकर्न मोटर सायकल क्र एम.एच.10. बी. वाय 9440 ने रवाना झालो. आमचे पाठोपाठ शासकीय टाटा सुमो मधून स्टाफ व पंच नं. 2 असे माझे पाठोपाठ रवाना झाले. मी व पंच चव्हाण असे ग्रामपंचायत कार्यालयाचे समोर येवुन माझी मोटर सायकल रोड कडेला पार्क केली. मी व पंच श्री. चव्हाण असे पायी चालत ग्रामपंचायत कार्यालय श्री पाटील, ग्रामविकास अधीकारी हे बसतात त्या ठिकाणी गेलो. त्यावेळी पाटील यांची त्यांचे कार्यालयातील कर्मचा-यांशी चर्चा सुरु होती. त्यांचेतील चर्चा झाले नंतर श्री पाटील यांनी मला काय? काम होत असे विचारुन,खोलीत या असे सांगुन श्री पाटील हे त्यांचे खोलीतून बाहेर येवुन तलाठी बसतात त्या खोलीच्या बाजुस असले खोलीमध्ये गेलो मी व पंच चव्हाण असे त्यांचे सोबतच सदर खोलीमध्ये गेलो. त्यावेळी मी त्यांना तुम्ही सांगीतल्या प्रमाणे चार लाखाचे तीन टक्के प्रमाणे बारा हजार रुपये आणले असले बाबत सांगीतले. त्यावेळी पाटील यांनी त्यांचा उजवा हात पुढे करुन पैसे देणे बाबत इशारा केला त्यावेळी मी माझ्या पन्टच्या पाठीमागील उजवे बाजुच्या खिश्यातील 12,000/- रुपये लाच रक्कम माझ्या उजवे हाताने बाहेर काढुन पाटील यांचे समोर धरली असता पाटील यांनी सदरचे 12,000/- रुपये त्यांच्या उजव्या हाताने स्विकारुन दोन्ही हातानी मोजून डाव्या हाताने त्यांच्या पन्टच्या समोरील डावे बाजुच्या खिश्यामध्ये ठेवली. तेव्हा मी पाटील यांना चेक कधी येईल असे विचारले असता श्री पाटील यांनी आज आण्णाकडे पाठवलाय असे सांगीतले त्यानंतर माझ्यात व पाटील यांच्यात माझ्या कामाच्या चेक बाबत चर्चा झाली. श्री पाटील यांनी मला आज आण्णा आले तर सह्या आज होतात, असे सांगीतले. त्यानंतर मी पाटील यांना चालतयं येऊ का असे विचारुन सदर खोलीतून बाहेर येवुन ग्रामपंचायत कार्यालयाचे बाहेर आलो व लाच स्विकारले बाबतचा पुर्व नियोजित इशारा केला. माझा इशारा पाहुन चौगुले साहेब पंच जाधव व सापळा पथक असे माझे जवळ आले. चौगुले साहेब यांनी माझेकडून व्हाईस रेकर्डर घेवून तो बंद करुन त्यांचे ताब्यात घेतला, मी चौगुले साहेब यांना पंच चव्हाण हे श्री पाटील बसले खोलीच्या बाहेर थाबले असले बाबत सांगीतले. त्यावेळी त्यांनी मला बाजूला जावून थांबण्यास सांगून ते सर्वजण लोकसेवक श्री पाटील, ग्रामविकास अधीकारी बसले असल्या ठिकाणी गेले. मी ग्रामपंचायत कार्यालयाचे बाहेर बाजूला थांबून राहीलो. थोडया वेळाने चौगुले साहेब यांनी मला श्री पाटील बसतात त्या ठिकाणी बोलवून घेतले. सदर कार्यालयामध्ये अंधार करुन माझे हात व कपडे तपासण्यात आले. त्यावेळी माझे उजवे हाताचे बोटावर व पन्टचे पाठीमागील उजवे बाजुचे खिशाचे तोंडास व आतील ब